नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०२/२०२५ (सोमवार) सकाळ**

---

## रामटेक परीसरात सुरू असणाऱ्या वेश्याव्यवसायावर धाड टाकुन देहव्यापार करणाऱ्या एका पिडीत महिलेची सुटका करून ६ आरोपीतांवर गुन्हा नोंद नागपूर ग्रामीण, रामटेक पोलीसांची धडक कारवाई

**पोलीस स्टेशन रामटेक :-** दिनांक १६/०२/२०२५ रोजी रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, आरोपी क्रं. १) अनुराग विजय गौर वय २४ रा. कान्द्री माईन ०५ मनसर अमरज्योती रेस्टारेंट अँड लॉज नगरधन, ता रामटेक हा स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी महीलांना पैश्याचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून अमरज्योती रेस्टारेंट अँड लॉज नगरधन ता. रामटेक येथे रूम उपलब्ध करून देवून देहव्यापार करवुन घेत आहे. अशी गुप्त माहीती मिळाल्याने अमरज्योती रेस्टारेंट अँड लॉज येथे रामटेक पोलीसांनी धाड टाकली असता आरोपी क्र १) अनुराग विजय गौर वय २४ रा.कान्द्री माईन ०५ मनसर अमरज्योती रेस्टारेंट अँड लॉज नगरधन, २) आकाश धिरशिंग बिरवे वय २५ रा.डांगा इंदोरा ता.मौदा,३) राहुल प्रेम राय, वय २४ वर्ष पुराना विद्यासागर कॉलेज जवळ आदर्श कॉलोनी शितलवाडी हे अनैतिक देहव्यापार चालवत असतांना मिळुन आले तसेच सदर गुन्हयात आरोपी क्रं ४) गोपी ठाकुर रा.रामटेक ५) मोंटी नगरे रा.रामटेक ६) प्रशांत कामडी रा.नगरधन (हॉटेल मालक) यांचा सुध्दा सहभाग असल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद ६ आरोपीतांविरूध्द पोस्टे रामटेक येथे कलम ३,४,५,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम १९५६ अन्वये गुन्हा नोंद करून एका पिडीत महिलेची सुटका करण्यात आली आहे. तसेच घटनास्थळावरून ६१,३३५ /- रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला आहे. **यातील आरोपी क्र १ ते ३ यांना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर